मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.
दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.

जा.क्र.मनपा/आस्था/426/२०२५-२६ दि. 07/०५/२०२५

//परिपत्रक//

**विषय: कर्मचाऱ्यांचा कामकाजाचा तपशील (जॉब चार्ट) विभागात लावणे बाबत.**

महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये नागरिक/लोकप्रतिनीधी/पत्रकार कामानिमित्त भेट देत असतात. सदर नागरिक/लोकप्रतिनीधी/पत्रकार यांना त्यांचे काम ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती होणेसाठी मा. आयुक्त महोदय यांनी सर्व विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचे कामकाजाचा तपशील (जॉब चार्ट) विभागाच्या दर्शनी भागावर लावण्याचे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने सर्व विभाग प्रमुखांना त्यांच्या अधिनिस्त असणारे सर्व कर्मचारी वर्ग यांचे नामफलक, पदनाम व कामाचा तपशील (जॉब चार्ट) दर्शनी भागात लावणे संदर्भात सूचना निर्गमित केल्या होत्या. तथापि दि.०६/०५/२०२५ रोजी मा. आयुक्त महोदय यांनी महानगरपालिका कार्यालयात स्थळ पाहणी केली असता पाहणी दरम्यान काही विभागांनी कर्मचाऱ्यांचे नामफलक, पदनाम, व कामकाजाचा तपशील (जॉब चार्ट) विभागात लावले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी सर्व विभाग प्रमुख यांनी आपल्या विभागाचे कामकाज दर्शविणारा तक्ता तसेच आपले व आपल्या अधिनस्त काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, टेबल क्रमांक, कामकाजाचा तपशील (जॉब चार्ट) दर्शनी भागावर ठळकपणे लावावा व तसा अहवाल पुढील सात दिवसात आस्थापना विभागास सादर करावा.

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त(मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रत माहितीस्तव-
१)मा. आयुक्त,
२)मा. अतिरिक्त आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner